माटुंगा पोलीस ठाणे, मुंबई.
दिनांक- ११/०४/२०२४.

# प्रेस नोट

## Share Market Fraud बाबत उज्जैन, इंदोर, मध्यप्रदेशस्थित चालू असलेले कॉल सेंटर उध्वस्त करून मुख्य आरोपीतांना अटक करून विविध राज्यातील सायबर गुन्हे उघडकीस आणलेबाबत....

माटुंगा पोलीस ठाणे हद्‌दीतील फिर्यादी नामे श्री. चंद्रशेखर आनंदराव तावरे, वय ५६ वर्ष, माटुंगा पूर्व, मुंबई ४०००१९ यांना फेब्रुवारी २०२४ मध्ये मो. क्र. ९६८५१३०७६५ च्या धारकाने त्यांचे मोबाईल क्रमांकावर फोन करून त्यांना शेअर मार्केटसंदर्भात माहीती देवून तसेच त्याच्या **Profit Bull & M/S L B Enterprises, Banglore** या कंपनीबाबत माहीती देवून एक बनावट लिंक पाठवून **Profit Bull** नावाचे ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यास सांगितले. त्यानंतर फिर्यादी यांना चांगले रिटर्न मिळतील असे सांगून त्यांचा विश्वास संपादन करण्यासाठी सुरूवातीला **₹ 07,500/-** गुंतवणुकीवर इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा वापर करून चांगले रिटर्न दाखवून वरीलप्रमाणे वरील ॲप मध्ये लॉगिन करण्यास सांगून **NEFT & UPI** व्दारे वेगवेगळया बॅक खात्यांवर एकुण **₹ 08,33,000/-** पैसे भरण्यास भाग पाडले. त्यानंतर फिर्यादी यांनी पैसे विड्राल करण्याचा प्रयत्न केला असता ते झाले नाही. त्यावेळी त्यांनी आरोपीला संपर्क साधला असता तो पुन्हा वेगवेगळया कारणांसाठी पैसे पाठविण्याबाबत सांगू लागला. त्यामुळे फिर्यादी यांना संशय आल्याने त्यांनी पोलीस ठाणेस तक्रारअर्ज दिला होता. त्यानुसार त्यांचा सविस्तर जबाब नोंद करून माटुंगा पोलीस ठाणे गु. र. क्र. १७२/२४ कलम ४०९, ४२०, ४६७, ४६८, ४७१ भादविसह कलम ६६ क, ६६ ड **IT Act** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तपास- माटुंगा पोलीस ठाणेच्या सहायक पोलीस निरीक्षक दिगंबर पगार व त्यांचे सायबर पथकाने आरोपीतांनी वापरलेल्या बॅंक खात्यांचे विश्लेषण करून आरोपी नामे राज बहाद्‌दुर राम सिंग भदोरीया, वय ६२ वर्ष, रा. ठि. घर नं. ११८, सैनिक कॉलनी, गोले का मंदीर, ग्वालियर, मध्यप्रदेश यास दि. ०६/०४/२०२४ रोजी मुंबई विमानतळ येथून ताब्यात घेवून अटक केली. नमुद आरोपीताकडून खालील वस्तू हस्तगत करण्यात आल्या आहेत.

१. ०४ डेबिट कार्ड व क्रेडीट कार्ड,
२. ०४ विवध बॅंक खात्यांचे चेकबुक,
३. ०३ मोबाईल,
४. ०५ सिमकार्ड,

वर नमुद आरोपीताकडे चौकशी केली असता या प्रकारच्या गुन्हयांतून विविध बॅंक खात्यांवर आलेले पैसे काढून ते उज्जैन, इंदोर येथे पाठवत असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार अधिक तांत्रिक तपास करून खालील दोन आरोपीतांना दि. १०/०४/२०२४ रोजी विजयनगर, इंदोर, मध्यप्रदेश येथून अटक करण्यात आली आहे.

१. अंकित उर्फ राजकुमार श्रीराम शिंदे, वय ३० वर्ष, रा. ठि. ३९ वर्ष, अंजनी नगर, क्रिष्णा मिल्क सेंटरजवळ, इंदोर, मध्यप्रदेश .
२. संजय भगवानदास बैरागी, वय २८ वर्ष, रा. ठि. गांव-करंज, तहसिल-तराणा, जि. उज्जैन, मध्यप्रदेश

वरील आरोपीतांकडे अधिक तपास केला असता सदर आरोपी व नमुद गुन्हयातील इतर पाहीजे आरोपी यांचेसह महानंदानगर, उज्जैन, मध्यप्रदेश येथे कॉल सेंटर चालवत असल्याचे समजल्याने त्यानुसार नमुद कॉल सेंटरवर धाड घालून खालील मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे.

कॉल सेंटरवरील जप्त मुद्देमाल :-

१. १६ मोबाईल
२. १५ सिमकार्ड
३. ०१ लॅपटॉप
४. राउटर
५. ०३ लाख पेक्षा अधिक लोकांचा मोबाईल क्रमांकांचा डाटा.

नमुद आरोपीतांनी वापर केलेले मोबाईल क्रमांक, बँक खाती इ. वरून **NCCR Portal** वर तक्रारी तपासल्या असता एकुण ३९ तक्रारी आढळून आल्या आहेत. नमुद आरोपी हे दि. १५/०४/२०२४ रोजीपर्यंत पोलीस कोठडीत आहेत. त्यांचेकडून प्राप्त झालेला डाटा व बँक खाती याबाबत तपास चालू आहे.

सदर कामगिरी मा. पोलीस आयुक्त, मुंबई, श्री. विवेक फणसळकर, विशेष पोलीस आयुक्त, मुंबई, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त, (कायदा व सुव्यवस्था ) मुंबई, श्री. सत्यनारायण, मा. अपर पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक विभाग, मुंबई, श्री. अनिल पारसकर, मा. पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-०४, मुंबई, श्री. प्रशांत कदम, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, माटुंगा विभाग, मुंबई श्री. संजय जगताप, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, माटुंगा पोलीस ठाणे श्री. दिपक चव्हाण, पोनि श्री. संजय परदेशी यांचे मार्गदर्शनाखाली सायबर अधिकारी सहा. पोलीस निरिक्षक दिगंबर पगार, पो.ह. क्र. ०६११३६/संतोष पवार, पो.ह .क्र. ०५०८१०/मंगेश जऱ्हाड, (**CDR/SDR/Location** मदत पो. ह.क्र. ०१५८९/ निकम, पो.शि. ११०५४०/साळुंखे, परिमंडळ ०४, मुंबई ) यांनी यशस्वीपणे पूर्ण केली आहे.

....................................